# मिरा-भाईंदर महानगरपालिका
## माहिती व जनसंपर्क विभाग
## // प्रेसनोट //

**अर्थसंकल्पिय अंदाजपत्रक तयार करण्यास येणाऱ्या अडचणीचे निराकरण करण्याकरिता मा.आयुक्त यांच्या निर्देशानुसार बैठकीचे आयोजन.**

- सन 2023-24 चे सुधारीत व सन 2024-25 चे मुळ अंदाजपत्रक तयार करण्यास दि.24/11/2023 रोजीचे परिपत्रक सर्व विभागांना देण्यांत आले होते. त्यानुसार अंदाजपत्रक तयार करताना येणाऱ्या अडचणीबाबतचे निराकरण करण्यासाठी मा.स्थायी समिती सभागृह येथे दि.06/12/2023 रोजी बैठक आयोजित करण्यांत आली होती.
- मा.आयुक्त सो., यांचे सुचनेनुसार सदरची बैठक श्री. अनिकेत मानोरकर, अतिरिक्त आयुक्त (1) यांच्या अध्यक्षतेखाली पार पाडली. यामध्ये अतिरिक्त आयुक्त, सर्व उप-आयुक्त तथा अधिकारी वर्ग उपस्थित होते. यामध्ये प्रामुख्याने श्री. सुधीर नाकाडी, मुख्यलेखापरीक्षक, डॉ. का.रा.जाधव, मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी अंदाजपत्रक तयार करण्यासाठी दिलेल्या नमुन्यामध्ये माहिती कशाप्रकारे भरावयाची आहे. याबाबत मार्गदर्शन केले.
- यामध्ये प्रामुख्याने उत्पन्नात वाढ कशी करता येईल, उत्पन्नाची बाजू निश्चित करताना नविन-नविन उत्पन्नाचे मार्ग शोधणे, थकबाकी वसूलीवर भर देणे, तसेच शासनाकडून विकास कामांकरिता जास्तीतजास्त अनुदान प्राप्त करून घेणे. त्याचप्रमाणे मागील 3 वर्षात प्राप्त झालेले उत्पन्न तसेच कराची मागणी (Fix Demand) विचारात घेवून त्यानुसार उत्पन्नामध्ये वाढ अथवा घट करावी.
- खर्चाची बाजू निश्चित करताना प्राप्त होणाऱ्या उत्पन्नाचा विचार करूनच कोणत्याही खर्चाच्या लेखाशिर्षात अवास्तव वाढ न करता आपल्या विभागास देण्यांत आलेल्या तरतूदीमध्येच वाढ अथवा घट करावी. नविन विकास कामे प्रस्तावित करताना मागील विकास कामांच्या स्पिल ओव्हरची प्रथमतः तरतूद करावी. सन 2023-24 चे सुधारीत व सन 2024-25 चे मुळ अर्थसंकल्पीय अंदाज तयार करताना सन 2023-24 मध्ये होणारा प्रत्यक्ष खर्च व सन 2024-25 मध्ये लागणारा खर्च विचारात घेवूनच प्रत्यक्ष खर्चाच्या तरतूदी प्रस्तावित कराव्यात.
- दि.24/11/2023 रोजीच्या परिपत्रकानुसार अंदाज पत्रकाची माहिती दि.11/12/2023 पर्यंत लेखा विभागाकडे देण्यांत यावी व त्यानुसार विभागनिहाय बैठकीचे आयोजन करण्यांत येईल. अशा सुचना बैठकीस देण्यांत आल्या आहेत.